पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १६
सभावृत्तांत

दिनांक - २४.७.२०१२ वेळ - दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक २४.७.२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगदीश शेट्टी सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.छाया जगन्नाथ साबळे
६) मा.जम सोनाली पोपट
७) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
८) मा.पाडाळे निता विलास
९) मा.जावेद रमजान शेख
१०)मा.जगताप नवनाथ दत्तु
११) मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१२) मा.भोसले राहुल हनुमंतराव
१३) मा.चोंधे आरती सुरेश
१४) मा.भालेकर अरुणा दिलीप
१५) मा.अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील
१६) मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी - आयुक्त, मा. कदम - अति.आयुक्त,मा.सावंत - सह.आयुक्त मा.मुंढे,मा.कारचे,मा.ढेरे,मा.गावडे,मा. झुरे,मा.दुरगुडे,मा.बंब - सहा. आयुक्त, मा.घाडगे - मुख्य लेखापरिक्षक,मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे -विकास अभियंता, मा.चव्हाण,मा.तुपे - सह शहर अभियंता,मा.भोसले -मुख्यलेखापाल, मा. डॉ.जगदाळे - प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर,मा.ढगे, मा.निकम,मा.सवणे,मा.इंगळे,मा.जाधव,मा.कुदळे,मा.थोरात, मा.चौधरी,मा.जाधव - कार्य.अभियंता, मा.जाधव - शिक्षणाधिकारी (माध्यमिक) , मा.माछरे-विशेष अधिकारी,मा.जगताप - समाज विकास अधिकारी,मा.पाटिल(आय.टी.आय),मा.डॉ.सावळे - वैद्यकिय अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-

विषय क्रमांक : ११) मौजे वाकड येथील ३० मी व १८ मी रुंद रस्त्याकरीता जमिनीचे भुसंपादन करणेबाबत..

विषय क्रमांक :- १२) (मित्रा) नाशिक येथे प्रशिक्षण आयोजनाबाबत..

विषय क्रमांक :- १३) BRTS प्रकल्पांतर्गत प्रकल्प सल्लागार नियुक्त करणेबाबत..

विषय क्रमांक :- १४) प्राधिकरण पेठ क्र.१० येथे पंपींग स्टेशन करीता विज पुरवठा करणेबाबत..

विषय क्रमांक :- १५) मनपाच्या काळाखडक येथे उंच टाकी करीता वीज पुरवठा घेणेबाबत..

विषय क्रमांक :- १६) सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभागातील कामाच्या तरतुदी मध्ये फेरबदल करणेबाबत..मा.आरती चोंधे,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- १७) तरतुद वर्ग करणेबाबत.. मा.आरती चोंधे,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- १८) लेखाशिर्षावर अंतर्गत वाढ घट करणेबाबत..मा.आरती चोंधे,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- १९) मानधनावर नेमणुक करणेबाबत..मा.आरती चोंधे,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- २०) ब्लॅकबेरी मोबाईल खरेदी करणेबाबत..मा.आरती चोंधे,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- २१) आकुर्डी भाजी मंडई येथील गाळे भाडेकराराने देणेबाबत..मा.,सुषमा तनपुरे,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- २२) चिंचवड प्रभाग क्र.२२ मधील सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकातुन वाढ घट होणेबाबत..मा.अश्विनी चिंचवडे,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- २३) तरतुद वर्ग करणेबाबत..मा.सोनाली जम, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- २४) अ प्रभाग स्थापत्य मधील कामांना तरतुद वर्ग करणेबाबत.. ..मा.सुषमा तनपुरे,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- २५) वॉर्ड क्र.१३ येथील कामांसाठी तरतुद वर्ग करणेबाबत..मा.सुषमा तनपुरे,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- २६) सी एन जी रिक्षा किट अनुदानाबाबत..मा.नवनाथ जगताप,मा.अविनाश टेकावडे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- २७) ठरावात दुरुस्ती करणेबाबत.. मा.नवनाथ जगताप,मा.अविनाश टेकावडे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- २८) ठरावात दुरुस्ती करणेबाबत..मा.आरती चोंधे,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव..

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

मा.चंद्रकांत वाळके | मा.जावेद शेख

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.आयुक्त यांना आलेल्या धमकीचा निषेध करणेत यावा.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

(पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.आयुक्त यांना आलेल्या धमकीचा निषेध करणेत येत असल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीने मुख्यलेखापाल पदावर रुजु झालेले प्रमोद भिमराव भोसले यांनी स्वत:चा परिचय करुन दिला.

--------

दिनांक १७/७/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक -८१२ | विषय क्रमांक - १

दिनांक - २४/७/२०१२ | विभाग - मध्यवर्ती सा.भांडार (वैद्य)

सुचक :- मा.सुषमा तनपुरे | अनुमोदक :- मा.निता पाडाळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/४/कावि/३२७/१२ दि.१६ /७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे --

मनपाच्या वैद्यकीय विभागांतर्गत विविध दवाखाने व रूग्णालयांना आवश्यक लागणारे हॉस्पीटल फर्निचर खरेदीकामी प्रसिध्द करणेत आलेल्या नि.क्र.४/२०११-१२ मधील आयटम क्र.१, ४, ७, ९, १६, १७ (एकूण ६ आयटम) करीता र.रू.२,०३,२२१/- चे हॉस्पीटल फर्निचर मे.मनाली एन्टरप्रायजेस यांचेकडून प्राप्त झालेल्या लघुत्तम दरानुसार व आयटम क्र.२, ३, ५, ६, ८, ११, १२, १४, १५, १८, १९ (एकूण ११ आयटम) करीता र.रू. २,०७,५००/- चे हॉस्पीटल फर्निचर मे.निर्मिती इंजि. कार्पोरेशन यांचेकडून प्राप्त झालेल्या लघुत्तम दरानुसार तातडीची बाब विचारात घेता दि.८/११/२०११ रोजीच्या प्रस्तावान्वये मान्यता घेऊन वैद्यकीय विभागातर्फे पुरवठा आदेश देणेत आलेले असून मे.मनाली एन्टरप्रायजेस व मे.निर्मिती इंजि.कार्पोरेशन यांनी कराराने करून दिलेले आहेत सदर संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८१३ विषय क्रमांक - २
दिनांक - २४/७/२०१२ विभाग - .दुरसंचार
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.सोनाली जम
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दुरसंचार/२/कावि/१३३/१२ दि.१६ /७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन --

१)श्री.खडतरे संदेश शामकुमार, क.अभियंता (स्था.)-१ नग २)उद्यान विभाग, नेहरूनगर-१ नग, ३)क्रिडा विभाग, नेहरूनगर -१ नग ४)कार्यशाळा, नेहरूनगर-१ नग याप्रमाणे MTS यांची ३ GB Limit असलेली प्रतिमाह र.रू.५००/- ची वायरलेस ब्रॉडबॅड सुविधा पुरविणेस व येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच चार प्रभागाचे जनगणना कामासाठी - ४ , अग्निशामक विभागासाठी- १ व नागरी सुविधा कक्षासाठी १ या प्रमाणे सदर सुविधा पुरविणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८१४ विषय क्रमांक - ३
दिनांक - २४/७/२०१२ विभाग - वायसीएमएच
सुचक :- मा.जावेद शेख अनुमोदक :- मा.आरती चोंधे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच/१/कावि/१४४/१२
दि.१६ /७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे --

वाय.सी.एम.रूग्णालयाचे ENT वॉर्ड करिता आवश्यक डार्क गॉगल्स मे.पी.शेषाद्री अँण्ड कंपनी यांचेकडील प्राप्त दरपत्रका नुसार खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या र.रू.३४,०००/- [र.रू.चौतीस हजार] चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८१५ विषय क्रमांक - ४
दिनांक - २४/७/२०१२ विभाग - माध्यमिक शिक्षण
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य शि/५/कावि/१४६/१२
दि.१७ /७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे --

माध्यमिक विद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी व कासारवाडी येथील विद्यार्थ्यांना १५ ऑगस्ट, २०१२ स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांना खाऊ म्हणून ८१ ग्रॅम ब्रिटानिया गुड डे रिच बटर कुकीज बिस्कीट पुडे प्रति नग र.रू९=०९ या दराने एकूण बिस्कीट पुडे नग १०,५२६ प्रमाणे एकूण र.रू.९५,६८१/- [र.रू.पंच्यान्नव हजार सहाशे ऐक्याऐंशी] खर्च अपेक्षित असून सदरच्या खर्चास तसेच नामांकीत कंपनी ब्रिटानिया इंडस्ट्रीज लिमि. बेंगलोर या उत्पादित कंपनीचे पिंपरी-चिंचवड मधील अधिकृत विक्रेते मे.गायत्री एंटरप्रायजेस, पिंपरी यांचेकडून कंपनीच्या दरात बिस्कीटे करारनामा न करता,

सरळ थेट पध्दतीने खरेदी करणेस तसेच त्यांना सदरची आगाऊ रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८१६ विषय क्रमांक - ५
दिनांक - २४/७/२०१२ विभाग - उद्यान
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. उद्यान /१/कावि/१००/१२
दि.१७ /७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.१/२०१२-१३ मधील अ.क्र.१ अन्वये, प्रादेशिक विज्ञान केंद्र (सायन्स पार्क) येथील उद्यान विषयक काम करणेकामी मे.तावरे कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४१,५६,५१०/- [र.रू.एक्केचाळीस लाख छपन्न हजार पाचशे दहा] पेक्षा २०.२५ % कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८१७ विषय क्रमांक - ६
दिनांक - २४/७/२०१२ विभाग - स्थापत्य ब मुख्यालय
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र. स्था/नि/२ब/कावि/१९७/१२
दि.१७ /७/२०१२

मा.शहर अभियंता यांची शिफारस विचारात घेवुन -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.जी४ए/२४/२०११-१२ मधील अ.क्र.५ अन्वये, चिंचवड वॉर्ड क्र.६७ येथे सुदर्शन हेल्थ क्लबचा पहिला मजला वाढविणेकामी मे.अभय कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.२३,३४,१७७/- [र.रू.तेवीस लाख चौतीस हजार एकशे सत्याहत्तर] पेक्षा १.५७ % जास्त) (सुधारीत १.५० % जास्त) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२३,६९,१९०/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी/शर्ती प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८१८ विषय क्रमांक - ७
दिनांक - २४/७/२०१२ विभाग - स्थापत्य मुख्यालय
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र. स्था/नि/१अ/कावि/२१४/१२
दि.१८ /७/२०१२

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.G४B/६/२०११-१२ मधील अ.क्र.९७ अन्वये, चिंचवड वॉर्ड क्र.३७ मधील शाळा इमारतीची स्थापत्य विषयक

दुरुस्तीची व रंगसफेदीची कामे करणेकामी मे.शिवम एंटरप्रायजेस (नि.र.रू.१८,६७,४१४/- [र.रू.अठरा लाख सदुसष्ट हजार चारशे चौदा] पेक्षा ४.९९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. १८,६२,९४२/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८१९ विषय क्रमांक - ८
दिनांक - २४/७/२०१२ विभाग - भुमी आणि जिंदगी
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.सोनाली जम
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.भुजि/२/कावि/१२५/१२
दि.१० /७/२०१२

विषय :- से.नं.२३, वाहतुकनगरी येथील भूखंडाबाबत प्राधिकरणाचे अधिकाऱ्यासह बैठक आयोजित करणेबाबत..

विषय क्रमांक ८ चा विचार दि.२३/१०/२०१२ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८२० विषय क्रमांक - ९
दिनांक - २४/७/२०१२ विभाग - नागरवस्ती वि.योजना
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/१/कावि/४८६/१२
दि.१७ /७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

नागरवस्ती विकास योजना विभागाकडील केंद्रशासन पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना, महिला व बाल कल्याण, मागासवर्गीय कल्याणकारी योजना अपंग कल्याणकारी योजना, तसेच विविध उपक्रम राबविणेकामी योजनांचे वस्तीपातळी वरील काम करणे व योजनांचे पुर्तता करणेकामी प्रस्तावात नमुद समुहसंघटकांची नेमणूक तात्पुरत्या सस्वरूपात एकत्रित दरमहा मानधन प्रत्येकी र.रू.७,५१७/- व वाहन भत्ता र.रू.५००/- एकूण र.रू.८,०१७/- अदा करणेत येत असून सदरची नेमणूक मानधन तत्वावर ६ महिने कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेस व मानधन खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८२१ विषय क्रमांक - १०
दिनांक - २४/७/२०१२
सुचक :- मा.छाया साबळे अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- १) मा.निलेश पांढरकर,मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव..
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १८/७/२०१२ ठराव क्र.१६

प्रभाग क्रमांक १६ मधील कै.पांडूरंग काळभोर सभागृह येथे कै.कैलास पांढरकर व्यायामशाळा असून ती मानधनावर श्री तुळजामाता महिला बचत गटास चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक -८२२ विषय क्रमांक - ११
दिनांक - २४/७/२०१२ विभाग :- नगररचना व विकास
सुचक :- मा.छाया साबळे अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/वाकड/२३९/१२ दि.२४/७/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.टीपीएस - १८०५/१०५०/प्र.क.-७९५/०५/नवि-१३ दिनांक ९ जुलै २००८ अन्वये भागशः मंजुर विकास योजना शासनाने मंजुर केलेली आहे. त्याप्रमाणे भागशः मंजुर विकास योजनेतील प्रस्तावात नमुद प्रमाणे प्रस्तावित रस्त्यांचे जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १९८४ अन्वये तातडीने संपादन करणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८२३ विषय क्रमांक - १२
दिनांक - २४/७/२०१२ विभाग - जलशुध्दीकरण केंद्र
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.सोनाली जम
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जशुके/पापु/६६/१२ दि.२३/७/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पाणीपुरवठा विभागाकडील कनिष्ठ अभियंते व उप अभियंता सह एकुण २५ अभियंतांच्या पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मित्रा) या नाशिक येथील प्रशिक्षण संस्थेत १५ दिवसाचे प्रशिक्षणासाठी र.रु. ४,२१,८७५/- चे खर्चास व २५ प्रशिक्षणार्थी यांना पुणे ते नाशिक व नाशिक ते पुणे एशियाड बस चे भाडे (प्रत्यक्षात असलेले) अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८२४ विषय क्रमांक - १३
दिनांक - २४/७/२०१२ विभाग - स्थापत्य
सुचक :- मा.अविनाश टेकावडे अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/वाक/कावि/४६/१२ दि.२३/७/१२

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -

पिंपरी चिंचवड हद्दीतील BRTS प्रकल्पासाठी राबवायच्या intelligent Transport System (iTS) प्रणालीकरीता pre-Bid बाबींकरीता UMTC नवी दिल्ली यांनी प्रस्ताव सादर केलेला असून त्यामध्ये pre-Bid व post Bid बाबींकरीता प्रकल्प खर्चाच्या २.५% प्रत्येकी अशी एकुण ५% अधिक सर्व्हिस टॅक्स सल्लागार फी आकारणेत येईल असे नमुद केलेले आहे. तरी पिंपरी चिंचवड हद्दीतील BRTS प्रकल्पासाठी ITS प्रणालीकरीता Pre Bid व Post Bid बाबींकरीता UMTC, नवी दिल्ली , यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्ती करणेस व प्रकल्प खर्चाच्या २.५% प्रत्येकी अशी एकुण ५% अधिक सर्व्हीस टॅक्स सल्लागार फी अदा करणेचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८२५ विषय क्रमांक - १४
दिनांक - २४/७/२०१२ विभाग - जलशुध्दीकरण केंद्र
सुचक :- मा.छाया साबळे अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ :- मा.सहशहर अभियंता यांचे जा.क्र.जशंके/वि/कावि/२४६/१२ दि.२३/७/१२

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या गवळीमाथा, प्राधिकरण पेठ क्र.१० व १२ तसेच WD - ४ परीसरातील पाणीपुरवठयामध्ये सुधारणा होणेकरीता JNNURM फेज II प्रकल्पांतर्गत प्राधिकरण पेठ क्र.१० येथे नवीन शुध्द पाणीपुरवठा पंपींग स्टेशन कार्यान्वित करणे बाबत नियोजन करण्यात आलेले आहे. कार्यान्वित करण्यात येणा-या पंपींग मशिनरीच्या विजपुरवठयाकरीता सुरक्षा ठेव रक्कम व पर्यवेक्षण शुल्क रक्कम रु.१०,८६,६०५/- म.रा.वि.वि.कंपनीस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८२६ विषय क्रमांक - १५
दिनांक - २४/७/२०१२ विभाग - जलशुध्दीकरण केंद्र
सुचक :- मा.जावेद शेख अनुमोदक :- मा.नवनाथ जगताप
संदर्भ :- मा.सहशहर अभियंता यांचे जा.क्र.जशंके/वि/२४८/१२ दि.२३/७/१२

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या काळाखडक (जुना) येथे पाणी पुरवठा विभागामार्फत बुस्टर पंप बसविण्याचे काम पुर्ण झाले असुन सदर ठिकाणी वीजपुरवठा घेणेबाबत मा.कार्यकारी अभियंता (पापु) यांनी कळविले आहे. त्यानुसार अनामत रक्कम व इतर चार्जेस मिळुन एकुण र.रु. १५,३५४/- मराविवि कं. मर्यादित यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८२७ विषय क्रमांक - १६
दिनांक - २४/७/२०१२
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.सोनाली जम
संदर्भ :- मा.आरती चोंधे,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव -
ड प्रभाग सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकातील

| अ.क्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान.क्र./अ.क्र | सन २०१२-१३ चा मुळ अंदाज | वाढ | घट | सन २०१२-१३ चा सुधारित अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.९४ किर्तीनगर मधील चौकांमध्ये वाहतुक सुरक्षिततेच्या दृष्टीने स्थापत्य विषयक कामे करणे | किरकोळ दुरुस्ती व देखभाल(प्रभाग) | ४८१/१३४ ४ | ४०,०००/- | ३०,०००/- | - | ७०,०००/- |
| २ | प्रभाग क्र.९७ पिंपळे गुरव येथे ठिकठिकाणी बस स्टॉप उभारणेबाबत.. | किरकोळ दुरुस्ती व देखभाल (प्रभाग) | ४८०/१२८ ८ | ४,००,०००/- | - | ३०,०००/- | ३,७०,०००/- |
| | | | एकुण | ४,४०,०००/- | ३०,०००/- | ३०,०००/- | ४,४०,०००/- |

वरीलप्रमाणे कामाच्या तरतुदीत वाढ /घट करणेस मान्यता देणेत येत आहे.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८२८ विषय क्रमांक - १७
दिनांक - २४/७/२०१२
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.सोनाली जम
संदर्भ :- मा.आरती चोंधे,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव -
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१२ - १३ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकातील

| अ.क्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकातील पान.क्र./अ.क्र | सन २०१२-१३ मध्ये असलेली तरतुद र.रु. | सन २०११-१२ मध्ये आवश्यक र.रु. | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विशालनगर वॉर्ड क्र.८९ मध्ये आरोग्य निरीक्षक केबीन बांधणे व अनुषंगिक कामे करणे. | इमारत योजना (प्रभाग) | ४५९/९ | ३,००,००० | ३,००,००० | ३,००,००० | - |
| २ | प्रभाग क्र.९० पिंपळे निलख येथील विनायकनगर ,क्रांतीनगर इ.ठिकाणचे अंतर्गत रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे.. | डांबरी रस्ते (मुख्यालय) | ४०५/१४ | ३,००,००० | - | - | ३,००,००० |
| | | | एकुण र.रु. | ६,००,०००/- | ३,००,०००/- | ३,००,०००/- | ३,००,०००/- |

वरील प्रमाणे कामाच्या तरतुदीत वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८२९ विषय क्रमांक - १८

दिनांक - २४/७/२०१२

सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.सोनाली जम

संदर्भ :- मा.आरती चोंधे,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१२ - १३ अंदाजपत्रक ३ मधील स्थापत्य उद्याने या लेखाशिर्षावर

| पानांक | अ.क्र | कामाचे नाव | करावयाची वाढ | करावयाची घट |
|---|---|---|---|---|
| ४९७ | २८ | चिखली मैलाशुध्दीकरण केंद्र येथे पर्यावरणविषयक व उद्यानविषयक सुधारणा करणे. (१५०० मी जॉगिंग ट्रॅक करणे,शेततळी,गझेबो व उद्यान विषयक कामे करणे | ५०००००० | ० |
| ५०२ | ७१ | तळवडे गट नं.१ब येथे डियर पार्क विकसित करणे. | ० | ५०००००० |
| | | एकुण | ५०००००० | ५०००००० |

वरील प्रमाणे  वाढ /घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८३० विषय क्रमांक - १९

दिनांक - २४/७/२०१२

सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.सोनाली जम

संदर्भ :- मा.आरती चोंधे,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आयुष्यातील काही महत्वाच्या प्रसंगावर आधारीत म्युरलस बनविण्याचे काम चालु होत आहे. यामध्ये महामानवाच्या या म्युरलस मध्ये कोणत्याही प्रकारची चुक होऊ नये. तसेच हे काम चांगल्या पध्दतीने व्हावे म्हणुन यासाठी तज्ञ आंबेडकरी अभ्यासक म्हणुन प्रा.दि.वा.बागुल यांची योग्य त्या मानधनावर नेमणूक करुन येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच शरद जाधव सो.दुधेकर सो,मा.सोनकांबळे चंद्रकांता यांची मार्गदर्शक कमिटीमध्ये नेमणुक करण्यात यावी. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८३१ विषय क्रमांक - २०
दिनांक - २४/७/२०१२
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.सोनाली जम
संदर्भ :- मा.आरती चोंधे,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव -

मा.उपसंचालक नगररचना यांचे वापरासाठी ब्लॅकबेरी मोबाईल टॉर्च ९५१० स्लायडर फोन अथवा कर्व्ह ९३६० हँडसेट मे.एन.एस.जैन ॲण्ड कंपनी यांचेकडुन खरेदी करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८३२ विषय क्रमांक - २१
दिनांक - २४/७/२०१२
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.सोनाली जम
संदर्भ :- मा.सुषमा तनपुरे,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव -

मौजे आकुर्डी येथील भाजी मंडईमध्ये काही गाळे रिक्त आहेत. तरी सदरचे गाळे प्रतिमहा रु.१२००/- या दराने ५ वर्षाच्या मुदतीने नोंदणीकृत करारनामा करुन खालील व्यक्तींना देण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | नाव | गाळा क्रमांक |
|---|---|---|
| १) | प्रशांत मारुती साबळे<br>रा.प्राधिकरण सेक्टर २७ निगडी ४४ | ३६ |
| २) | परेश दिगंबर भोसे<br>२/- सेक्टर २७, प्राधिकरण पुणे | ४० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८३३ विषय क्रमांक - २२
दिनांक - २४/७/२०१२
सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे
संदर्भ :- मा.अश्विनी चिंचवडे,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव -

चिंचवड प्रभाग क्र.२२ मधील सन २०१२ - १३ चे अंदाजपत्रकामधुन वाढ घट खालील कामांसाठी करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | पान क्र | लेखाशिर्ष | कामाचे नाव | सन २०१२-१३ मधील तरतुद | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१ | २५० | किरकोळ दुरुस्ती देखभाल | प्रभाग क्र.२२ (वॉर्ड क्र.६४) चिंचवड गावठाण मध्ये | ३९९००० | ३५१००० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | महासाधु गोसावी यांचे संजीवन समाधी महोत्सवासाठी मंडप व्यवस्था करणे. | | | |
| २८ | ९४७ | प्राथमिक व दुय्यम शिक्षण | प्रभाग क्र.२२ (वॉर्ड क्र.६४) चिंचवड मधील चापेकर चौकातील जुनी शाळा ईमारत पाडुन नवीन शाळा इमारत बांधणे. | १९९९८०० | १७४९००० | |
| २३ | २१९ | पुल प्रकल्प | वॉर्ड क्र.६४ धनेश्वर चिंचवड थेरगाव पुलाची दुरुस्ती करणे. | ६००००० | | ६००००० |
| ३३ | २२३ | इमारत सांस्कृतिक केंद्र | चिंचवड येथील व्यायामशाळा इमारत बांधणे | १५००००० | | १५००००० |
| | | | | | २१००००० | २१००००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८३४ विषय क्रमांक - २३
दिनांक - २४/७/२०१२
सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे
संदर्भ :- मा.सोनाली जम,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव -

मनपाच्या सन २०१२-१३ अंदाजपत्रक ३ मधील स्थापत्य उद्याने या लेखाशिर्षावर खालील प्रमाणे अंतर्गत वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

| पानांक | अ.क्र. | कामाचे नाव | करावयाची वाढ | करावयाची घट |
|---|---|---|---|---|
| ४९९ | ४४ | शाहुनगर येथील राजर्षी शाहु उद्यानातील जेष्ठ नागरीकांचे शेडवर स्लॅब टाकणे. | १५००००० | ० |
| ५०२ | ७१ | तळवडे गट नं.१ब येथे डियर पार्क विकसित करणे | ० | १५००००० |
| | | एकुण | १५००००० | १५००००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८३५ विषय क्रमांक - २४
दिनांक - २४/७/२०१२
सुचक :- मा. सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा. सोनाली जम
संदर्भ :- मा.सुषमा तनपुरे, मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव -

मनपाच्या सन २०१२-१३ अंदाजपत्रकातील अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील उंच अनाधिकृत व विनापरवाना इमारती निष्कासित करणेसाठी निविदा काढणे आवश्यक आहे. तरी अशा कामांची निविदा काढणेकामी सन २०१२ -१३ च्या अंदाजपत्रकात खालील तक्त्याप्रमाणे वाढ व घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | पान क्र. | अ.क्र. | कामाचे नाव | सन २०१२ - १३ मधील अंदाजपत्रकीय तरतुद | सन २०१२ - १३ साठी आवश्यक तरतुद | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सन २०१२ -१३ च्या अंदाजपत्रकातील वाढ करावयाची काम | | | | | | | |
| १ | १३२ | ४३ | अ प्रभागात अतिक्रमण कारवाईसाठी क्रेन, जेसीबी,ट्रक पुरविणे | ० | ५०००००० | ५०००००० | ० |
| सन २०११ -१२ च्या अंदाजपत्रकातील घट करावयाची काम | | | | | | | |
| १ | ९३४ | १ | प्र.क्र.२२ (जुना) आकुर्डी येथील नवीन रुग्णालय इमारत बांधणे | १००००००० | ५०००००० | ० | ५०००००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८३६ विषय क्रमांक - २५

दिनांक - २४/७/२०१२

सुचक :- मा. सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा. सोनाली जम

संदर्भ :- मा.सुषमा तनपुरे, मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव -

मनपाच्या सन २०१२-१३ अंदाजपत्रकामध्ये वॉर्ड क्र.१३ येथील कामासाठी खाली नमुद प्रमाणे तरतुद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. | सन २०१२-१३ तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सुधारित अंदाजपत्रक १२-१३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.१३ येथील ताब्यात आलेल्या आरक्षणास संरक्षक भिंत उभारणे व इतर कामे | इमारत योजना | ३३३/५१ | १२५०००० | ० | ११००००० | १५०००० |
| २ | वॉर्ड १३ येथे पेव्हिंग ब्लॉक व इतर स्थापत्य विषयक कामे करणे | दगडी फरशी व फुटपाथ | ३१६/६५ | २५००००० | ० | २३००००० | २००००० |
| ३ | वॉर्ड क्र.१३ दिघी येथील सं.नं.६६ मधील दफनभूमीस वेटींग शेड व इतर स्थापत्यविषयक कामे करणे. | स्मशानभुमी | ९६२/१५ | ११००००० | १०००००० | ० | २१००००० |
| ४ | क प्रभागातील विविध ठिकाणच्या रस्त्यामध्ये सर्व्हीस लाईन टाकल्यानंतर रस्ते दुरुस्त करणे | खडी मुरुमाचे रस्ते | २८१/३८ | १२००००० | १४००००० | ० | २६००००० |
| ५ | वॉर्ड क्र.१३ दिघी येथील स.नं.१९ मध्ये प्ले ग्राऊंड व इतर सुधारणा कामे करणे | स्थापत्य विषयक कामे करणे | ३६४/९ | १५००००० | ८००००० | ० | २३००००० |
| ६ | वॉर्ड क्र.१३ येथील विविध ठिकाणचे अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | डांबरी रस्ते | २९८/९३ | ५००००० | २००००० | ० | ७००००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | एकुण | ८०५०००० | ३४००००० | ३४००००० | ८०५०००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८३७ विषय क्रमांक - २६

दिनांक - २४/७/२०१२

सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :- मा. अविनाश टेकावडे

संदर्भ :- मा.नवनाथ जगताप,मा.अविनाश टेकावडे यांचा प्रस्ताव -

पिंपरी शहर परिसर देशातील सर्वाधिक प्रदुषित विभागामध्ये येतो शहरातील प्रदुषण कमी करण्यासाठी येथील वाहने सर्वप्रथम रिक्षा एल.पी.जी. सी.एन.जी सारख्या पर्यावरण मित्र इंधनावर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या भुरेलाल समिती ने दिले आहेत त्यानुसार शहरातील सर्व जुन्या रिक्षा एल.पी.जी. व सी.एन.जी करण्याचा आदेश राज्य शासनाने प्रादेशिक परिवाहन प्राधिकरणाने दिले आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिकाचा धरतीवर पिंपरी चिंचवड शहरातील ज्या रिक्षाचालकांनी आपल्या जुन्या व नव्या रिक्षा सी.एन.जी किट बसविली आहे. अशा रिक्षांना प्रत्येकी १२,०००/- रुपये एकदाच अनुदान शहराची पालक संस्था म्हणुन देण्याचा निर्णय पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थायी समिती घेत आहे. त्या करीता आगामी अंदाजपत्रक सन २०१३-१४ मध्ये ५ कोटीची तरतुद करण्यात यावी या कामाला तातडीने सुरवात व्हावी म्हणुन रु.१ कोटीची तरतुद वर्गीकरणाने लगेच उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही प्रशासनाने तातडीने करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८३८ विषय क्रमांक - २७

दिनांक - २४/७/२०१२

सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :- मा. अविनाश टेकावडे

संदर्भ :- मा.नवनाथ जगताप,मा.अविनाश टेकावडे यांचा प्रस्ताव -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.G१/२१/२४/२०११/१२ मधील अ.क्र.२२ अन्वये, वॉर्ड क्र.७५ पिंपळे सौदागर येथे पेट्रोल पंप ते मिलिटरी हद्दी पर्यंतच्या १८.०० मी.डी.पी. रस्त्यांची सुधारणा करणेकामी मे.व्ही.एम.मातेरे इन्फ्रास्ट्रक्चर (इं) प्रा.लि. (नि.र.रु.९३,३७,०६८/- (त्र्याण्णव लाख सदोतीस हजार अडुसष्ट) पेक्षा (१४%जास्त) ०.४०% जास्त (सुधारीत दर) या ठेकेदाराकडुन निविदेतील रक्कम रु. ९३,७४,४१६/- + १४% जास्त दर+भाव वाढ रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार निविदेतील निविदा अटीप्रमाणे डांबर,सिमेंट,लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ /घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -८३९ विषय क्रमांक - २८
दिनांक - २४/७/२०१२
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.अश्विनी चिंचवडे
संदर्भ :- मा.आरती चोंधे,अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव -

मा.स्थायी समिती ठराव क्र.७३२ दिनांक १०/७/२०१२ मधील "यांची छपाई प्रेस नसल्याने" हा मजकुर वगळुन त्याऐवजी "यांचे निविदेतील लघुत्तम दराने" हा मजकुर समाविष्ट करण्याची दुरुस्ती करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**(जगदीश शेट्टी )**
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/१०३८/२०१२
दिनांक - २७/७/२०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.